लाईफ इज
ब्युटिफुल



वीणा पाटील
veena@veenaworld.com

# फिनिक्सियन्स

**म्हणजे आपण काठमांडूला यायला तसा उशीरच झाला म्हणायचा. आम्ही सगळेच पर्यटक भुकंपानंतरच पडझड झालेलं नेपाळ शोधत होतो पण गेल्या तीन चार दिवसांच्या प्रवासात त्याचा कुठे मागमूसही दिसला नाही.**

माझ्या बत्तीस वर्षांच्या पर्यटन कारकिर्दीत कधीही आला नव्हता एवढा पर्यटकांचा रिस्पॉन्स यावर्षी म्हणजे दोन हजार पंधरामध्ये नेपाळला मिळाला होता. दर दोन दिवसांनी असणाऱ्या सहली काठोकाठ फूल्ल झाल्या होत्या आणि आम्ही उरलेल्या मधल्या दिवसांमध्ये आणखी सहली हव्यात म्हणून एअरलाइनशी बोलणी करीत होतो. म्हणजे 'नेपाळसाठी दररोज सहल' आपल्या महाराष्ट्रातून हे कधी घडलं नव्हतं ते ह्यावर्षी घडत होतं. आमचे नेपाळमधले पार्टनर्स खूष होते. फेब्रुवारीमध्ये मी जेव्हा वुमन्स स्पेशलसाठी काठमांडूला गेले होते तेव्हा त्यांची खूशी जाणवत होती, त्यांनी नव्या कोऱ्या लक्झरी बसेसचीही ऑर्डर दिली होती. एकूणच वीणा वर्ल्ड झाल्यानंतर आम्ही आमच्या जगभरातल्या पार्टनर्स आणि असोसिएट्सना जादा बिझनेस देऊन आनंद दिला होता, काही उद्योजक तर नव्याने जन्माला आले होते किंवा जे लडखडत होते ते अधिक उभारी घेत होते. एबीसी अॅडव्हेंचर्सचे ईश्वर आणि रुस्तम मला विचारत होते, 'ताई क्या हम यहाँ नेपाल में सालाना दस हजार टुरिस्ट नहीं ला सकते वीणा वर्ल्ड के जरिये?' त्यांना म्हटलं, 'अरे थांबा थोडं, यावर्षी आपण शुन्यातून तीन ते साडेतीन हजार लोकं आणणार आहोत तुमची इच्छा लवकरच पूर्ण होईल.' जशी त्यांची अपेक्षा वीणा वर्ल्डमुळे वाढली होती तशीच पर्यटकांमुळे आमचीही. बघानं! लेह लडाख, भूतान, अंदमान, नेपाळ, नॉर्थ इस्ट म्हणजे सेव्हन सिस्टर्स अशा थोड्या दुर्लक्षित किंवा ज्या सेक्टर्सच्या वाट्याला जायचं मोठं धाडस कुणी करीत नाही तीथे वीणा वर्ल्डने गेल्या दोन वर्षात घट्ट पाय रोवले होते, हजारो टुरिस्टना तिथे घेऊन जाऊन तसंच तिथल्या स्थानिक लोकांना काम देऊन. व्यवसाय वाढवत असताना असं सर्वंकष समाधान आपण मिळवू शकलो नं तर आपल्या जगण्याला, आपल्या व्यवसायाला, आपल्या माणसांना आणि आपल्या असण्यालाच एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. वीणा वर्ल्ड झाल्यानंतर ज्या धडाडीने आमच्या टीमने- असोसिएट्सनी-पार्टनर्सनी आणि मुख्य म्हणजे पर्यटकांच्या सपोर्टने एक विश्व निर्माण केलं त्याला तोड नाही, आणि त्यातून मिळणाऱ्या समाधानाचीही गणती नाही.

त्याच समाधानात न्हाऊन निघत असताना समर सिझनच्या सहली सुरु झाल्या. आम्ही डोळ्यात तेल घालून निगराणी करीत होतो आणि पंचवीस एप्रिलला नेपाळच्या महाभयंकर अशा भुकंपाने हाहाकार माजवला. होत्याचं नव्हतं झालं, वीणा वर्ल्डचा एक ग्रुप एअरपोर्टला अडकला, संपर्क जोडला जाईपर्यंत जीवाची जी घालमेल झाली ती विचारु नका. दोन दिवसांनी ग्रुप सुखरुप परत आला, जाणाऱ्या सहली म्हणजे संपूर्ण समर सिझनच आम्हाला रद्द करावा लागला. सिझनकडे मोठी आस लावून बसलेल्या आमच्या ईश्वर आणि रुस्तम सारख्याच नेपाळमधल्या अनेक पर्यटन कंपन्यांची स्वप्न अक्षरशः धुळीस मिळाली. लिखाणाच्या जाहिरातीच्या माध्यमातून अथक परिश्रमाने वाढवलेली नेपाळची पत पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. बुकिंग केलेल्या सर्व पर्यटकांनी संपूर्ण साथ दिली आणि कुणी मॉरिशसला, कुणी थायलंडला, कुणी भूतानला तर कुणी नैनिताल काश्मीरला वा युरोपला जाऊन आले. ढासळलेल्या मनस्थितीतून ईश्वर-रुस्तमची टीम बाहेर येत होती आणि त्यांनी विचारायला सुरुवात केली होती, कधीतरी त्यांचा फोन यायचा आणि म्हणायचे, 'ताई अभी यहाँ फॉरिन टुरिस्ट आना शुरु हुवा है। हमारी टूर्स कब शुरु होगी?' वीणा वर्ल्डसाठी नाही पण ईश्वर आणि रुस्तम आणि त्यांच्या टीमचा हौसला वाढविण्यासाठी नेपाळच्या सहली सुरु होणं खूप गरजेचं होतं.

थोड्या साशंक मनस्थितीतच मी दिवाळीमध्ये नेपाळच्या सहली जाहीर केल्या. माझ्या लेखांमधून मी अधूनमधून त्याविषयी लिहित होते पण बरेच दिवस बुकिंग येत नव्हतं. पर्यटकांनी नेपाळचं नाव टाकलं होतं आणि एक दिवस अचानक मला नेपाळला पहिलं बुकिंग आलेलं दिसलं. श्री. अवधूत व सौ. शीला गोडबोले ह्यांनी आशेचा किरण दाखवला. मी ऑफिसमध्येच बसल्या जागेवरुन अत्यानंदाने किंचाळले, 'अरे! बघताय काय? नेपाळला बुकिंग आलं,' आम्ही टाळ्या वाजवून आनंदाचं सेलिब्रेशन केलं, आणि मग हळू हळू एकेक बुकिंग यायला लागलं. मी पण जाहीर केलं की नेपाळाला पर्यटनदृष्ट्या उर्जितावस्था देणाऱ्या ह्या पर्यटकांसोबत मी आणि सुधीरसुद्धा जाणार. आणखी एक आनंदाची गोष्ट घडली ती म्हणजे रॉयल नेपाल एअरलाईन्स ही नेपाळची राष्ट्रीय विमान कंपनी, त्यांनी बंद केलेली मुंबई-काठमांडू-मुंबई विमानसेवा सुरु केली. सुधीर आणि आमच्या एअर रिझर्वेशन्स मॅनेजर प्रमोद राणेने त्यांच्याशी मिटींग करुन त्यांनाही भरोसा दिला की आम्ही तुमच्या साथीला आहोत. आमच्या पार्टनर्सनी नेपाळहून कळवलं की ह्या वीणा वर्ल्डच्या पहिल्या वहिल्या ग्रुपसाठी आपल्या नवीन लक्झरी बसचं आगमन झालंय. सगळं मस्त जुळून आलं आणि आम्ही मी, सुधीर, टूर मॅनेजर संदेश वाघ दिवाळीनंतर सोळा नोव्हेंबरला काठमांडूला पोहोचलो आमच्या एकूण पंचवीस पर्यटकांसह.

काठमांडूला उतरलो तर तिथे पर्यटकांची-खास करुन फॉरिन टूरिस्टची ही गर्दी. उतरल्या उतरल्याच त्यांना बघून मनात आलं, म्हणजे आपण काठमांडूला यायला तसा उशीरच झाला म्हणायचा. आम्ही सगळेच पर्यटक भूकंपानंतरच पडझड झालेलं नेपाळ शोधत होतो पण गेल्या तीन चार दिवसांच्या प्रवासात त्याचा कुठे मागमूसही दिसला नाही. अर्थात त्यामुळे रोडावलेली भारतीय पर्यटकांची संख्या जाणवत होती, कुठेही गर्दी नाही की गजबजाट. आम्हाला सारखं वाटत होतं की, 'भारतीय पर्यटकांची संख्या ह्या ठिकाणी वाढवणं हे आपलं कर्तव्य आहे' आणि ते पार पाडायचंच. आत्तापर्यंत आम्ही मनोकामनाचा रोप वे, चितवनची एलिफंट सफारी, कॅनॉय राईड, फोक डान्स ह्या सगळ्या गोष्टींचा मनसोक्त आस्वाद घेतला. काय मस्त वाटत होतं, सगळे पर्यटकही सारखं सांगत होते की आम्हाला नेपाळला यायचंच होतं, आणि ह्या पहिल्या सहलीचे पहिले प्रवासी झाल्याचा आम्हाला अभिमान वाटतोय. पर्यटकांचा निरोप घेऊन निघताना आम्ही त्यांना म्हटलं की, 'ही सहल, त्याला तुम्ही दिलेला प्रतिसाद आणि वाढवलेला इथल्या लोकांचा हौसला आमच्या सतत लक्षात राहील आणि आम्ही सदैव तुमचे ऋणी राहू.'

नेपाळची ही सहल जशी एक माईलस्टोन ठरली तशीच आणखी तीन सहली महत्वाच्या ठरल्या ह्या दिवाळीच्या सुट्टीत त्या म्हणजे युरोपच्या. आम्ही तयारी करीत होतो काठमांडूची, तेवढ्यात तेरा नोव्हेंबरला पॅरिसवर हल्ला झाल्याची बातमी आली, लगेचच दोन दिवसात तीन सहली होत्या, धडाधड पर्यटकांचे फोन वाजायला लागले, कॅन्सलेशनसाठी नाही तर आपली टूर जाणार आहे नं? त्यासाठी! काळ बदलतोय, माणसं बदलताहेत, माणसांची मानसिकता अतिटणक होतेय असंच मला वाटलं. हल्ला झाला तेव्हा सुनिला आणि सारा पॅरिसमध्ये होत्या, त्या घाबरुन परत आल्या नाहीत. आमच्या तीनही सहली युरोपात पोहोचल्यात आणि त्यातली एक आज पॅरिसला आहे. एकाही पर्यटकाने सहल रद्द केली नाही. हीच आहे फिनिक्सियन संस्कृती.

काय व्हायचं ते होऊ दे किंवा काहीही होवो 'चलते रहो! बढते रहो! हसते रहो!' 'काळ कुणासाठी थांबत नाही तू ही कुणासाठी थांबू नकोस' हे जास्त समर्पक आहे आजच्या युगासाठी, कारण आजचा काळ हा वेगवेगळ्या आवेशात आपल्यासमोर आव्हानासारखा उभा आहे. कधी तो निसर्गाच्या कोपाने पुराच्या-भूकंपाच्या-दुष्काळाच्या-अतिवृष्टीच्या स्वरुपात येतो तर कधी अतिहव्यासापोटी देशादेशात उफाळलेल्या हिंसेच्या वा आतंकवाद्यांच्या रुपात. जगात सुरक्षित असं आता काहीही राहीलेलं नसलं तरीही हे जग आजही तेवढंच सुंदर आणि हवंहवंस आहे, त्यासाठी आपल्या माणसांकडे, आपल्या संपन्न देशाकडे, आपल्या ऐतिहासिक भौगोलिक संपत्तीकडे डोळे उघडून आपल्याला बघायला हवं. आणि मग ह्या सुंदरशा जगात आपापल्या छानशा परीघात भक्कमपणे आपल्याला उभं राहता आलं पाहिजे फिनिक्सियन मनस्थितीने. ही जी आपली 'हर हाल में लक्ष को पाना है' वाली जनरेशन तयार होतेय त्याला मी 'फिनिक्सियन्स' म्हणते. फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतूनही उभारीने जिद्दीने उभं राहण्याची मानसिकता ठेवण्याची गरज कधी नव्हे एवढी आता आहे. बद्रिनाथ-नेपाळचा भूकंप, काश्मीरचा पूर, फूकेतची सुनामी, मुंबई-पॅरिसवरचे आतंकवादी हल्ले ह्यातलं आपण काहीही थोपवू शकत नाही, पण ह्या सगळ्यातून तरुन जायला आपल्याला 'फिनिक्सियन्सच्या न्यूजनरेशन' मध्ये भक्कम मानसिकता असलेल्या माणसांमध्ये आत्ताच सामिल व्हायला पाहिजे. चलो! व्हॉटेव्हर इट इज, लेट्स फेस इट, वेलकम टू दी जनरेशन ऑफ फिनिक्सियन्स!















VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate.
www.veenaworld.com | Toll Free : 1800 22 7979